# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.३/२०२६** **दिनांक ०५/०५/२०२६**
**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील अॅप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०५.०५.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/४४०/२०२६ दि.०२.०५.२०२६ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.**

**त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०५.०५.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्री. शिवाजी कचरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.**

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री. शिवाजी कचरे,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.०७.०४.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१४४ दि.०७.०४.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२ संस्थानचे प्रसादालय विभागासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी खाद्यतेल व किराणामाल ५ साहित्य खरेदीकामी वार्षिक ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१४५ निम्नतम दरधारक यांचेशी दराबाबत वाटाघाटी करण्यात याव्यात. त्यानंतर प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३ साईआश्रम भक्तनिवासस्थान व साई धर्मशाळा येथील कालबाहय झालेले फायर सिलेंडर बायबॅक करुन नवीन फायर सिलेंडर खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशनमधील न्युनतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१४६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.४ सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामधील संस्थानचे विविध विभागाकडील दैनंदिन वापराने खराब झालेल्या निरुपयोगी भंगार साहित्यांची विक्री करणेकामी प्राप्त ई-निविदेतील उच्चतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.१४७ परिशिष्ट अ प्रमाणे उच्चतम दरधारकांना मान्यता देण्यात येत आहे. प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.५ श्री साई प्रसादालयातील मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे बनविणे व चपाती बनविणे कामास मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४८ तीन महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे. विभागाने सी.ए. दाखल करण्याची कार्यवाही त्वरीत करावी.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.६ साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हरधूणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धूणे, चादर (ब्लॅकेट) धूणे व गादीच्या खोळी धूणेकामी ई-निविदा प्रकिया राबवून, नविन ठेकेदाराची नेमणुक होई पावेतो आहे त्याच मागील वर्षाचे मंजुर दरात मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४९ तीन महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे. विभागाने सी.ए. दाखल करण्याची कार्यवाही त्वरीत करावी.**

**(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.७ व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/ स्वच्छता कामे सध्या कार्यरत आऊटसोर्स ठेकेदाराकडून ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो आहे त्याच मंजूर दरात करून घेणेकामी मुदतवाढ कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१५० तीन महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे. विभागाने सी.ए. दाखल करण्याची कार्यवाही त्वरीत करावी.**

**(कार्यवाही-व्दारावती भक्तनिवास)**

---

**विषय नं.८ मे.भारती रेफ्रिजरेशन, नवी दिल्ली यांचे स्टेनलेस स्टील किचन इक्युपमेंट पुरवठा केलेल्या बिलाची Delhi Arbitration Centre यांनी अवार्ड केलेली रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१५१ राहाता न्यायालयाचे निर्णयाविरुध्द अपील दाखल करुन कनिष्ठ न्यायालयाचे आदेशास स्थगिती घ्यावी.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.९ संस्थानमार्फत सन २०२६-२७ मध्ये साजरे करणेत येणारे श्री गुरुपोर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव, श्री साई सच्चरित पारायण, नाताळ व नवीन वर्ष स्वागतासाठी तसेच पावसाळा या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी येणारे रक्कम रु.४८,२७,०००/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१५२ स्थळ पाहणी करुन त्यानंतर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१० श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे वास्तव्य अधिक सोईचे होऊन येथे भक्तांचा ओघ वाढावा यासाठी आध्यात्मिक कॉरीडोर विकसीत करणे, रस्ते विकास व सुशोभीकरण कामांचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणेसाठी प्रस्ताव मागविणेकरीता शासनाचे mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाचे e-RFP प्रस्तावाचे मसुद्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१५३ प्रस्ताव मंजुर. निविदा काढून प्री-बीड मिटींग घेण्यात यावी. प्री-बीडमध्ये ज्या सुचना येतील त्या समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात याव्यात.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.११ श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत बांधकामाचे ठेकेदार श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई वि. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे Arbitration (लवाद) कामकाजाकरीता संस्थानची बाजू मांडणेसाठी तसेच काऊंटर क्लेम करणेसाठी Advocate यांची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.१५४ विषयाच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली, दाव्याची रक्कम लक्षात घेता संस्थानतर्फे बाजु मांडण्यासाठी निष्णात वकीलाची नेमणूक करणे गरजेचे असल्याचे दिसुन आल्याने, आलेल्या प्रस्तावांपैकी ॲड. श्री. विजय सपकाळ, जेष्ठ अधिवक्ता, मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्यांनी कळविलेल्या शुल्कामध्ये रु.२,५०,०००/- ऐवजी रु.२,००,०००/- शुल्क त्यांचे तोंडी संमतीने ठरविण्यात येत आहे.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१२** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवास परिसरामध्ये साचणा-या पावसाचे पाण्याची विल्हेवाट लावणेसाठी शिर्डी-नांदुर्खी शिव हद्दीवरुन १२०० मी.मी.व्यासाचे दोन आर.सी.सी.पाईप टाकुन त्यावर डांबरीकरणामध्ये रस्ता विकसीत करण्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रु.७.६१ कोटी मात्रचा निधी शिर्डी नगरपरिषद यांना उपलब्ध करुन देणेविषयी शिर्डी नगरपरिषद यांनी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.

**निर्णय क्र.१५५** तहकुब.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१३** कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी कार्यरत डॉ.शैलेश कार्तिक ओक, वैद्यकीय संचालक यांचा तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आलेनंतर पुन्हा मुदतवाढ देणेबाबत.

**निर्णय क्र.१५६** संस्थाचे सेवाप्रवेश नियमास शासनाने मान्यता दिलेली आहे. डॉ.ओक यांचेकडे सेवाप्रवेश नियमानुसार पात्रता नाही. त्यामुळे त्यांची सेवा दि.२८/०५/२०२६ पासुन संपुष्टात येईल. विद्यमान वैद्यकीय संचालक यांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर वैद्यकीय संचालक हे पद कायमस्वरुपी भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडे प्रस्ताव सादर करावा. वैद्यकीय संचालक या पदाचा प्रभारी कार्यभार देण्यासाठी पात्र अधिकारी यांचे नावाचा प्रस्ताव समितीकडे सादर करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१४** निवासी वैद्यकीय अधिकारी (RMO) व न्युरोसर्जन यांची पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याचे कालावधीसाठी जाहिरातीव्दारे भरलेबाबत.

**निर्णय क्र.१५७** समितीने यापुर्वीच मान्यता दिलेली आहे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१५** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील आवश्यक रक्तपेढी सहाय्यक, परिचारक/ परिचारीका व ओ.टी.असिस्टंट पदे आऊटसोर्स लेबर ठेकेदारामार्फत भरणेबाबत.

**निर्णय क्र.१५८** प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१६ श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नव्याने आयुर्वेदिक आयपीडी विभाग सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१५९ प्रस्ताव नामंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.१७ संस्थानचे अधिनियम-२००४ लागू (दि.२२.८.२००४) होणेपुर्वी संस्थानचे इनसोर्स कंत्राटी कर्मचारी म्हणून कामावर हजर असलेले परंतु ११ महिने कालावधीसाठी नियुक्ती आदेश पारित होणेपुर्वी मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना ठेकेदारामार्फत आऊटसोर्स ऐवजी इनसोर्स कंत्राटी म्हणून कामावर सामावून घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१६० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.१८ संस्थानचे हैद्राबाद, बेंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.१६१ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१९ श्री. सोनाजी सर्जेराव आळंजकर, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवास विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१६२ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२० श्री. रंजन केशव त्रिभुवन, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१६३ तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री.प्रमोद प्रभाकर गोरक्ष, प्र.अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.१६४ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२२** **श्री.हेमंत भानुदास शिरसाठ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१६५ सेवेतून बडतर्फ का करण्यात येऊ नये अशी नोटीस देऊन त्यांनी खुलासा दिल्यास त्यासह फेर प्रस्ताव सादर करावा.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्री. रवि सतिष घुले, तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचे विभागीय चौकशी बाबत.**

**निर्णय क्र.१६६ संस्थानचे जे आर्थिक नुकसान झालेले आहे, त्याबाबत काय कार्यवाही करता येईल याबाबत कायदेशीर सल्ला घेऊन प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना विविध व्यवसायासाठी जागा/गाळे वापरास मुदवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१६७ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२५** **महाराष्ट्र राज्य कामगार विमा सेवा सोसायटीचा दवाखाना संस्थान परिसरात सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१६८ तहकुब.** **(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या Maharasthra State Board of skill vocational Education and Training (MSBSVET) अंतर्गत Short term courses सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१६९ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)**

---

**विषय नं.२७ श्री साईबाबा महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता Ad-hoc पध्दतीने एकत्रित मानधनावर कार्यरत असलेल्या सहाय्यक प्राध्यापकांना मुदतवाढ देणे तसेच सहाय्यक प्राध्यापकांचे उर्वरीत रिक्त पदांवर तासिका तत्वावर (CHB) पध्दतीने नेमणूका करणेकामी भरती प्रक्रिया राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.१७० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.२८ महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे पाल्यांसाठी इ.११वी व इ.१२वी करीता मोफत निवासी शिक्षण व विशेष कोचिंग सुविधा सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१७१ संस्थानने कोचींग सुविधा यापुर्वीच सुरु केलेली आहे. त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे जे पाल्य कॉलेजमध्ये प्रवेश घेतील त्यांना ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच त्यांना राहण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल मधील विद्यार्थ्यांचा शालेय गणवेशामध्ये बदल करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१७२ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.३० श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम-२००४ मध्ये करावयाच्या सुधारणा/दुरुस्ती करणेकामी शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.१७३ प्रस्ताव नामंजुर.** **(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.३१ सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात लाडू व बुंदी प्रसाद बनविणेसाठी खर्च झालेल्या हरबरा दाळ व हिरवी विलायची या किराणा मालाच्या घट-तुटीची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१७४ नोंद घेतली.**

**(कार्यवाही-लाडू व बुंदी प्रसाद निर्मिती विभाग )**

---

**विषय नं.३२** सन २०२५-२६ मध्ये (माहे एप्रिल-२०२५ ते मार्च-२०२६) दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत वाटप करणेत आलेल्या बुंदी प्रसाद पाकींटासाठी (५० ग्रॅम वजनाचे पाकीटे) आलेला खर्च रु.१४,९२,७२,६३०/-मात्रची नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.१७५** नोंद घेतली.

(कार्यवाही- लाडू व बुंदी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.३३** आर्थिक वर्ष सन २०२५-२६ (दि.०१.०४.२०२५ ते दि.३१.०३.२०२६) देणगीदार व मान्यवरांना भेट देण्यात आलेली संस्थान प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत.

**निर्णय क्र.१७६** प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३४** सन २०२५-२६ मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करणेत आलेल्या चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे व पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.१७७** नोंद घेतली.

(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)

---

**वरील निर्णय क्र.१४४ ते १७७ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.५.१५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ. पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(शिवाजी कचरे)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**